कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना
टोल फ्री क्रमांक - 1064
कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

:: प्रेस नोट :: दिनांक :- 30.03.2021.

पंचायत समिती, परतुर, जि. जालना अंतर्गत ग्रामपंचायत सावगीगंगा येथील 14 व्या वित्त आयोगाअंर्तगत तक्रारदार यांनी केलेल्या कामाचे बिलाचा चेक देण्यासाठी आलोसे 1. श्री. दगडुबा जनार्धन पवार वय 46 वर्षे, ग्रामसेवक सावगीगंगा, ता परतुर,जि जालना, 2. श्री अशोक कान्होबा चौधरी वय 46 वर्षे, ग्रामपंचायत सावरगाव बु//ता.परतुर, जि जालना यांना 20,000/-रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने रंगहात पकडले.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | 1. दगडुबा जनार्धन पवार वय 46 वर्षे, ग्रामसेवक सावगीगंगा, ता परतुर,जि जालना, 2. अशोक कान्होबा चौधरी वय 46 वर्षे, ग्रामपंचायत सावरगाव बु//ता.परतुर, |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 30.03.2021 रोजी पंचायत समिती, परतुर,जि.जालना. |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 20,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, तक्रारदार हे सावगीगंगा येथील रहिवाशी असुन त्यांनी सावगीगंगा ग्रामपंचायत, ता परतुर,जि जालना येथे 14 व्या वित्त आयोगाअंर्तगत नालीबांधकामावर सिमेंटचे ढापे व गावातील अंतर्गत रस्ते दुरुस्ती असे एकुण 1,07,000 रु.चे काम केले होते. सदरील कामाच्या बिलाचा चेक काढण्यासाठी 20,000/-रु लाचेची मागणी तक्रारदार यांचेकडे आलोसे 1 व 2 यांनी केली होती. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरून दिनांक 30.03.2021 रोजी लाचेची पडताळणी केली असता, तक्रारदार यांचेकडे आलोसे 1. दगडुबा जनार्धन पवार वय 46 वर्षे, ग्रामसेवक सावगीगंगा, ता परतुर,जि जालना, आलोसे 2. अशोक कान्होबा चौधरी वय 46 वर्षे, ग्रामपंचायत सावरगाव बु//ता.परतुर, जि जालना यांनी 14 व्या वित्त आयोगाअंर्तगत सावगीगंगा ग्रामपंचायतमध्ये नालीबांधकामावर सिमेंटचे ढापे व गावातील अंतर्गत रस्ते दुरुस्ती असे एकुण 1,07,000 रु.चे काम केले होते. व त्या बिलाचा चेक काढण्यासाठी 20,000/-रु लाचेची मागणी पंचासमक्ष करुन आलोसे नं. 1 यांनी दि. 30.03.2021 रोजी स्वत: पंचासमक्ष करुन स्वीकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने पंचायत समिती, परतुर येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक 1. दगडुबा जनार्धन पवार वय 46 वर्षे, ग्रामसेवक सावगीगंगा, ता परतुर,जि जालना, 2. अशोक कान्होबा चौधरी वय 46 वर्षे, ग्रामपंचायत सावरगाव बु//ता.परतुर, जि जालना (वर्ग - 3) यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री.राहुल खाडे, अपर पोलीस अधिक्षक अनिता जमादार, ला.प्र.विभाग औरंगाबाद, पोलीस उप अधिक्षक श्री.रविंद्र डी. निकाळजे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. एस.एस. ताटे, पोलीस अंमलदार श्री. ज्ञानदेव जुंबड, श्री. अनिल सानप, श्री. कृष्णा देठे,श्री.गजानन घायवट,श्री सचिन राऊत,श्री गणेश बुजाडे व चालक श्री प्रविण खंदारे यांनी कार्यवाही केली.

तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.

पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना